# तिमिरमंथन

श्रीकृष्ण रामचंद्र कुलकर्णी

BlueRoseONE.com
Stories Matter
NewDelhi • London

**BLUEROSE PUBLISHERS**
India | U.K.

Copyright © Shrikrishna Ramchandra Kulkarni 2026

All rights reserved by author. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the author. Although every precaution has been taken to verify the accuracy of the information contained herein, the publisher assumes no responsibility for any errors or omissions. No liability is assumed for damages that may result from the use of information contained within.

BlueRose Publishers takes no responsibility for any damages, losses, or liabilities that may arise from the use or misuse of the information, products, or services provided in this publication.

BlueRoseONE.com
Stories Matter
NewDelhi • London

For permissions requests or inquiries regarding this publication, please contact:

BLUEROSE PUBLISHERS
www.BlueRoseONE.com
info@bluerosepublishers.com
+91 8882 898 898
+4407342408967

ISBN: 978-93-7542-586-1

Cover design: Aafiya Saifi
Typesetting: Manisha Rawat

First Edition: January 2026

# समर्पण

बोधिसत्व कसे असतात हे मी पाहिले नाही, पण मी तुम्हास पाहिले. हे पुस्तक मी माझे वडील श्री रामचंद्र कृष्णाजी कुलकर्णी यांना समर्पित करत आहे.

# आभार


आई वडिलांचे आभार कधीच मानायचे नसतात.

शालूआक्का, नलूताई, मालिनी, अंबिका तुम्ही वडील बहिणी म्हणून वरदहस्त माथी ठेवलात.

प्रभाकर भाऊजी, शरद भाऊजी, प्रकाश भाऊजी, नंदू भाऊजी तुम्ही मेव्हण्यांपेक्षा मित्रच जास्त.

भाचे मंडळ - वर्षा, विद्या,प्रज्ञा, रेणू, प्रसाद, शील्पा, सारंग, श्रीरंग, अमृता, अश्विनी,ओंकार, आनंद –

पक्के दोस्त.

राखी, तू पण बायकोपेक्षा सखीच जास्त.

सिद्धांत आणि वेदांत, मी तुमचा मित्र बनण्याचा नेहमी प्रयत्न करतो.

# प्रस्तावना

हे माझे तिसरे पुस्तक. माझी काव्ययात्रा ही अंतर्मन, निसर्ग आणि समाज यांच्या त्रिवेणी संगमातून जाणारी एक अत्यंत संवेदनशील साहित्यिक सफर आहे. माझ्या तीनही पुस्तकांमधून — 'Songs of Soul', 'निजगंधा', आणि हा नवीन काव्यसंग्रह 'तिमिरमंथन' — मानवी अस्तित्वातील विविध स्पंदनांचा गूढ अनुभव वाचकासमोर येतो. पहिले पुस्तक 'Songs of Soul' हे आत्म्याच्या अनुभूतींना इंग्रजी भाषेतून मांडणारा काव्यसंग्रह आहे. जीवनाचा अर्थ, आत्मशोध व त्यानुसार निर्माण होणारे प्रश्न, ब्रह्मांडाशी असलेले नाते आणि मनाच्या लयी हे सर्व या पुस्तकात प्रकट होते. दुसरे पुस्तक 'निजगंधा' हे मनात दडलेल्या सूक्ष्म, अव्यक्त भावनांचे मराठी रूप. यात प्रेमाचा स्पर्श, निसर्गाचे सान्निध्य आणि आत्मिक गूढता यांचे दर्शन होते.

आणि आता सादर होत असलेला नवीन कविता-संग्रह — 'तिमिरमंथन'— हा समाजातील दुःख, तत्त्वज्ञान, निसर्ग, वेदना आणि करुणा यांचे यथार्थ चित्रण आहे. 'तिमिरमंथन' सारख्या कवितेतून समाजातील गडद सावल्या आणि मानवतेचा अंतिम प्रकाश उलगडतो; तर 'चित्तबीज' , 'अस्मादिक' आणि 'अस्तित्व' सारख्या कवितांतून अंतर्मनातील शाश्वत संवाद ऐकू येतो.

मानवी जीवन म्हणजे वेदना आणि संघर्ष, त्यावर आशेची फुंकर आणि विचारांचे दिग्दर्शन. अंधारातून प्रकाशाकडे झेपावणारा हा अनंत प्रवास. या प्रवासात जाणवणाऱ्या संवेदना शब्द, रुदन, हास्य, मौन अशी विविध रूपे धारण करतात. जेंव्हा त्याच संवेदना चित्रकाराच्या रेखणीप्रमाणे हळुवार सत्याशी लय साधतात तेंव्हा कविता जन्माला येते.

मानवी अस्तित्व म्हणजे वेदना, आशा, संघर्ष, विचार यांचा एक अखंड प्रवास. या प्रवासातून मनात दाटणारे अनुभव, कधी शब्दरूप घेतात, कधी

मौनात विरून जातात. पण काही क्षण असे येतात, जेव्हा अंतर्मन त्याच्या खऱ्या स्वरूपाला स्पर्श करते—आणि तेव्हाच कविता जन्माला येते.

या कवितासंग्रहातील प्रत्येक कविता माझ्या अनुभवांची, निरीक्षणांची, आणि मनात दाहकतेने पेटलेल्या प्रश्नांची मूर्ती रूप आहे. जखमा जोपर्यंत मेंदूला झिणझिण्या आणत नाहीत तो पर्यंत त्या तशाच जुन्या होत जातात आणि त्याचे दुर्लक्षित दुःखात रूपांतर होते. सामाजिक दुःखे हि अशाच स्वरूपाची असतात. या दुःखांनी माझ्यातील संवेदना जागृत केल्या, मनातील अंधाराने प्रकाशाची ओढ लावली, निसर्ग आणि अध्यात्म यांनी नवी दृष्टी दिली. या सर्वांचे मिश्रण बनून त्याचे शब्दरूपी प्रतिबिंब या पुस्तकात उमटले आहे.

किन्नर, वेश्येचं पोर, दारुड्याची बायको, चिमुरडी, नशा या सारख्या कविता समाज आणि दुःखाचे वास्तव दाखवतात. निर्वाण, श्वास, आद्य यासारख्या कविता अस्तित्व, शून्यता, चेतना, सत्य शोध अधोरेखित करतात. मनुष्य हा जसा एक जीव आहे, तसाच एक प्रश्नही आहे, आणि हे प्रश्नच त्याला पुढे नेतात. निसर्ग हा नेहमीच माझा गुरु राहिला आहे व झरा, निसर्ग, तारकांचे बोल अशा कविता निसर्गाचे सुंदर रूप दाखवून संवर्धनाची गरज अधोरेखित करतात. वेडा, स्वप्न, प्रेमभंग, आशा या कविता अंतर्मन, भावविश्व आणि वैयक्तिक संघर्ष नमूद करतात. तसेच धर्मदंड, सत्ता, विज्ञानदर्शन या कविता नैतिकतेचा गाभा दर्शवतात.

वाचकांनी या कवितांमध्ये स्वतःतील अनुभूतींना शोधावे, परदुःख अवलोकावें, स्वतःची सावली शोधावी ही माझी इच्छा. जर त्यातून स्व दर्शन होण्यास मदत होत असेल तर या पुस्तकाचा उद्देश पूर्ण झाल्याचं मला समाधान वाटेल.

श्रीकृष्ण कुलकर्णी

# अनुक्रमणिका


चिमुरडी .................... 1

वेश्येचं पोर .................... 3

धर्मदंड .................... 5

उत्खनन .................... 7

नशा .................... 9

अस्तित्व .................... 13

त्रिकाल .................... 15

सहिष्णुता .................... 16

शेतकऱ्याची आत्महत्या .................... 17

विज्ञानदर्शन .................... 19

दारुड्याची बायको .................... 21

निसर्ग .................... 22

दर्पण .................... 24

स्वप्न .................... 24

खगोल .................... 26

मौन .................... 27

अंधश्रद्धा ........................................................ 28
किन्नर ........................................................ 30
स्वेच्छामृत्यू ........................................................ 32
समाज ........................................................ 33
पोकळी ........................................................ 34
निर्वाण ........................................................ 36
प्रकाश बिंदू ........................................................ 38
त्यक्ता ........................................................ 39
न्यूनगंड ........................................................ 41
भिकारी ........................................................ 43
कुटुंब ........................................................ 45
धूम्रदैत्य ........................................................ 46
विवर ........................................................ 48
कर्मसन्मान ........................................................ 50
श्रद्धा ........................................................ 51
तारकांचे बोल ........................................................ 53
क्षितिजापल्याड ........................................................ 54
वेडा ........................................................ 55
अपमान ........................................................ 57

शांतता ........................................................................ 59

घडी ........................................................................ 61

इथेच ........................................................................ 62

वृक्षस्वप्न ........................................................................ 63

माड ........................................................................ 65

सत्ता ........................................................................ 66

प्रेमभंग ........................................................................ 68

गरिबी ........................................................................ 70

कवी ........................................................................ 71

नारी ........................................................................ 73

आशा ........................................................................ 74

भान आणि बंधन ........................................................................ 75

पत्थराचा डोंगर ........................................................................ 76

पैशाची बेडी ........................................................................ 78

झरा ........................................................................ 79

धारा ........................................................................ 80

झरोका ........................................................................ 81

माया ........................................................................ 83

पारतंत्र्य ........................................................................ 84

आद्य ....................................................................... 85

निर्विकार ................................................................... 87

अस्मादिक ................................................................. 89

श्वास ....................................................................... 91

चित्तबीज .................................................................. 93

तिमिरमंथन ............................................................... 95

# चिमुरडी

कठीण भ्रमर कधी न शोषतो कळीस सुकुमार
पशुस म्हणती पाशवी परी ना करती ते बलात्कार
का झाले माझ्यावरती लहानपणी ते अत्याचार
उमलत्या चिमुरडीस कुस्करे हा कोणता विकार

विचित्र चाहूल स्पर्शून गेली भयावह माझ्या मना
काय झाले मला ना कळले आठवे केवळ वेदना
किंकाळी काळीज फाडी बळे दाबली ती भावना
गारठले मी भयात इतकी अशक्य गमे ती कल्पना

आरशात मलाच पाहता प्रतिमा माझी पाहवेना
पापी मी मलाच वाटे कारण  काही नसताना
चूर मी लज्जेत झाले मजला कारण कळेना
पुरुषांचे तोंड पाहणे  भित्या मना सोसवेना

भय, क्रोध अन लज्जेचा त्रिशूल मजवर रोखला
मनात तांडव रौद्र त्यांचे भयाण आभास मनाला
आनंदाचा प्रणय वाटे वेदनेचा चित्कार मला
निसर्ग सुद्धा विपरीत वाटे विस्कटलेल्या मनाला

निर्मात्याने काम निर्मिला सातत्यास सृष्टीच्या
बहारास वृक्षांच्या अन संगीतास पक्ष्यांच्या
काम सोडी कामबाण साधूनी वेळा ऋतूंच्या
अवेळी चिरडता कन्या विपरीत ते निसर्गाच्या

का मज नाही संरक्षण समाजात सुधारीत या
का मज नाही समुपदेशन समाजात वागण्या
उजळ माथा घेऊन फिरतो देहास विस्कटुनिया
शिक्षा नसे पुरी त्यावर पळवाटा शोधून जाण्या

# वेश्येचं पोर

समाजाच्या कोपऱ्यातली, काळी कुट्ट गुहा अंधारी
विकार विवस्त्र विद्रोही,रांगेत उभे जिच्या द्वारी
लज्जा जेथे भान हरवते, अन विकट नाचते बावरी
शरीराच्या चिंध्या होती शृंगाराच्या या दरबारी

नका विचारू, कोण मी, पुत्र रांगेतील एकाचा
मज मातेशी संग झाला, काम उग्र प्रकोपाचा
गुहेत या येणार कसा योग सूर्य बघण्याचा
बंदिस्त मी धाकात आणिक वियोग प्रकाशाचा

खोकणारी आई माझी खडखडत्या पलंगावरती
दोरी असे पाळण्याची नाळेसम तिच्या हाती
शेवटी ना त्राण राहिले ना मिळे तिजला विश्रांती
मी जाता, काय होईल, हीच तिला सदैव भ्रांती

पलंगावर तिचा थांबला श्वास अखेर प्रक्षुब्ध
डोक्यावरती हात माझ्या ठेवुनी हरवली शुद्ध
बाहेर पडणे मार्ग एकला असे तिचा तो शब्द
जीवन नसे परी नरक तो गुहेत असता बद्ध

इथे राहता भीक आणिक कलंक नशिबी नावा
रोज पाहून मरते जीवन मनी पेटतो वनवा
अनाथ मजला आश्रमी मिळेल का विसावा
प्रकाश किरण घेऊन कुणी साधेल का दुवा

पोट जाळुनी जगणे का आमुच्याच नशिबी सारं
धर्म, अर्थ वा बळवंत आम्हा देतील का आधार
कुणी जानता गुरु आम्हाला देईल का संस्कार
तमस आमुचा उजळुनी करतील का स्वीकार

# धर्मदंड

विद्युल्लत्तेच्या लहरी जणू सभोवती फिरवतो
आकाशोन्मुख मुकुटचिन्ह शिरावरती मिरवतो
भव्य निडर ताठ, अंमल साऱ्यांवर गाजवतो
उभा धर्मदंड रोवला जो आकाशात जातो

बघून स्फुरतो साक्षात्कार सत्य गवसल्याचा
उद्देश उत्तुंग जगण्याचा, जीवन बहारण्याचा
निवाडा नीतिमूल्यांचा, स्व च्या उन्नतीचा
समुदाय अनुयायांचा, भास एका छत्राचा

अज्ञानाच्या अंधारातून धर्मदंड हाती घेतला
शब्दांच्या विळख्यात सारा लोक मानस आवळला
रुद्रावत राजशक्तीला फायदा मात्र बरा गमला
धर्मदंडाच्या शक्तीने उन्माद मात्र सर्वत्र पसरला

सुर्यासम ते धर्मछत्र झाले एका समुदायाचे
उद्देश झाला बोथट स्वप्न विपरित आकांक्षाचे
सत्य झाले बोथट अन भाट कल्पित गोष्टींचे
स्व शोधणे राहून गेले केवळ साधन तुष्टीचे

नीती तत्वे केवळ झाली भाषा बोलण्याची
शस्त्रांनी घेतली जागा तात्विक शब्दांची
अमल झाला अमली, आकांक्षा मात्र लढण्याची
रणांगनी धारातीर्थ शीरे पडली कित्येकांची

धर्मदंड पुन्हा उभारण्या अंतःकरणी मानवाच्या
प्रेषित ऋषी देतील का व्याख्या विश्व धर्माच्या
धर्मदंड तो उभारण्या उंचावरती मानवतेच्या
चुंबुन जाण्या चांदण्या, दावण्या वाटा प्रकाशाच्या

# उत्खनन

भूमातेच्या उदरामध्ये स्तरा स्तरांत लपलेला
इतिहास दावतो भग्न काळामध्ये दडलेला
सत्याचा तो अंश कणाकणाने उलगडलेला
या क्षणाच्या काळजाशी कारणभाव जडलेला

अशाच एका स्तरात लपली होती बाहुली काळी
अंगावरती विचित्र खुणांची दिसत होती बाळी
भयावह ती होती इतकी कोण तिच्याशी खेळी
कयास कसा काढावा धागा मिळेना  मुळी

एक म्हणे प्रचलित काळी जादू त्या शतकी
दूर राहा त्यापासून अजून आत्मा भटकी
दुजा म्हणे चिन्ह तयावर दाविती ती चेटकी
गाढून टाका पुन्हा अथवा समुद्रात फेकी

एक समुदाय शांत फारसा नसे मध्ये कुणाच्या
दुर्दैवाने स्त्रिया दागिने वापरत त्या चिन्हांच्या
संशयाच्या भावनेने द्वेष पसरला विरुद्ध तयांच्या
शेवटी वनवा पेटला अंती कैक ठिणग्यांच्या

पुन्हा काही काळाने खोदला खोल स्तरी
त्या स्तरात सापडली बाहुली एक सोनेरी
अंगावरती दिव्य खुणांची होती ती बावरी
राजस्वी ती अस्सल होती दिसे बहू सुंदरी

दिव्य खुनांचा पोशाख होता काही समुदायी
स्वतःस वंशज राजाचे कल्पून ते आततायी
आसनी ते रूढ झाले त्या बाहुलीची पुण्याई
स्वतःस पुढे नेण्यास बहू वापरली चतुराई

उदो उदो हा होत असे दिव्य पोशाखांचा
रस्त्यावरूणी वाजविती भव्य ध्वनी शंखांचा
वाळीत ते गेले बापुडे दोष केवळ चिन्हांचा
जन्मतःच कलंक अन प्रवास आव्हानांचा

जमिनीतला स्तर नेमका सामाजिक झाला
चिन्हांवरती माणूस तो इतका का भाळला
इतकासा इतिहास होता चिन्हांमध्ये साठला
इवल्याश्या धाग्याने सुतावरूनि स्वर्ग गाठला

# नशा

पाशवी असे सैतान जणू जलातला भोवरा
एका हाती निघत असे मदिरेची मादक धारा
दुसऱ्या हाती धरला नशेचा वल्ली पसारा
हरपून भान भ्रमात टाके विसर पडे सारा ॥ १ ॥

धमन्यांचे सर्प होऊनि अंगावरती वळवळती
हात पाय पंख होऊनि आभाळात उडती
अष्टपाद किडे त्वचेवर गुदगुल्या करती
कामाच्या चरमसीमेची वारंवार प्रचिती ॥ २ ॥

मनाच्या नयनांत जणू विकृत घातले अंजन
सैतानाच्या जगतामध्ये हृदय घेई स्पंदन
पक्षीरवाची जागा घेती गुंगवणारे गुंजन
हवेत झोके घेत चालते गूढ मनाचे रंजन ॥ ३ ॥

उधाण देई उत्कट तो नशेचा प्याला
परी ओततो आग आत जी मारक शरीराला
आसक्ती ती वाढत जाता नेई टोकाला
अल्प विराम देई त्या भंगल्या काळजाला ॥ ४ ॥

अस्तित्वात जे नाही, ते इंद्रियांना गमे
अवास्तव जागी तो भटकून तिथेच रमे
अपुरीच ती पडे नशा लालसा ना शमे
भयाण ते दर्शन दिसते नशा घेता नेमे ॥ ५ ॥

दुबळा माणूस बळी पडे सैतानाच्या पाशा
विस्कटल्या मनात दिसेना वापसीची आशा
परीक्षांची घडी सोडूनि आवडे तयांना नशा
मूल्य सांडूनि वेळेचे ते ओढवीती दुर्दशा ॥ ६ ॥

आत्म्याचा आवाज दबतो, विकारांचा विजय
मन जळते, चेतना हरते, अन निष्प्रभ हृदय
असंख्य विषय जगात असती होण्या तन्मय
निद्रेत जणू जीवन जाई मिळवाल ते काय?॥ ७ ॥

क्षणांत येता भानावरती आप्त बिचारे दिसती
जवळ तयाला घेता, शब्द तयांचे थरथरती
नशेतले क्षण आठवता अपराधी वाटे अती
बळे तयाला नशेपासून वंचित सारे ठेवती ॥ ८ ॥

अशाच एका जागृत क्षणी उपरती झाली
मति त्याची धुंदीतुनी स्वच्छ आत वळली
कुठे जायचे, कोण मी कोडी जाणवली
स्वत्वाचा सूर मिळाला मतीत ऊर्जा आली ॥ ९ ॥

नशे मध्ये असल्याचा काळ बळे विसरावा
निश्चयाचा मेरू आता स्वये उभा करावा
आशेचा किरण जागता सत्यात आणावा
जागृत होणे मंत्र एक तो पुनःपुनः स्मरावा ॥ १० ॥

स्वगत करे मी पक्षी होऊन हातात येऊ दे
मनाच्या पिंजऱ्यातून मज क्षणात उडू दे
हवेत झोके घेता मजला स्वतंत्र वाटू दे
सुखात दुज्यांच्या सुख वाटून जीवन नटू दे ॥ ११ ॥

स्वर्ण कवडसे आत्म्याचे चित्तात दिसू दे
चित्ताकाशी कैवल्याचे चांदणे झिरपू दे
मोकळी हवा मनाला साद घालू दे
चैतन्याचे असंख्य झरे हृदयात वाहू दे ॥ १२ ॥

निसर्ग अन निर्मात्याचे सुंदर गुंफण
विकारांच्या सोबत असे विचारांची पेरण
विकाराचा सैतान तया अंमली तर्पण
नका करू नशेला जीवन अर्पण ॥ १३ ॥

# अस्तित्व

मुंगीएवढे अस्तित्व माझे तरी हत्ती वरती स्वार
इवलीशी ती मुठबंद परी दावी पहाडी निर्धार
जन्मा पासून शेवटा पर्यंत जगण्याचा करार
अफाट निसर्गाचा होतो माझ्यातून अविष्कार ॥ १ ॥

निसर्गाचा देह कसा हा चेहरा दर्पण दाखवतो
डोळ्यांमध्ये लपलेला शोधण्या मी डोकावतो
अदृश्य आणिक शून्य दिसता अचंबित होतो
निसर्गात निर्माण नाव मी निसर्गात संपून जातो ॥ २ ॥

जगण्याच्या व्यापात विसरे जाणीव जगण्याची
यंत्रावत फिरवत राहतो गत होते खेळण्याची
निसर्गास निर्माण आवड अन नित्य नाविन्याची
नवे आकारा येई ढाळून जुने किमया ऋतूंची ॥ ३ ॥

कल्पनेचा विस्तार माझ्या निसर्ग उना पडतो
जरी ना पेलवे कायेस माझ्या हवेत मी उडतो
समुद्राच्या पृष्ठावरुनी धावत धावत मी जातो
मनात मी स्वतंत्र जरी संसाराला बांधून घेतो ॥ ४ ॥

चिंता आणिक भयात जखडली शक्ती तुफान
उद्रेक होती स्तरांत मनाच्या करती बेभान
मी मुक्त मनास सांगे उकल अंतरा महान
अथांगतेचा आभास देई त्या मी चे तत्वज्ञान ॥ ५ ॥

लहर असे मन माझे जिथे उत्कट भाव येती
स्पंदन असे त्याहूनि सूक्ष्म स्वत्व आकारती
निसर्गा पल्याड जाण्या कंपित मनाच्या भिंती
शाश्वत जेथे नांदते पोहोचण्यास त्या जगती ॥ ६ ॥

# त्रिकाल

सतत धावतो काळ जयाला उपमा नसे कशाची
ग्रह ताऱ्यांचे निर्माण आणिक प्रक्रिया मिटण्याची
जिथे घडे बदल तेथे उत्पत्ती मोजण्या काळाची
विश्वाच्या आद्यात वसते स्फुरण गणना क्षणांची

काळात उडतो जीवन पक्षी असे त्रिकाळ सन्मुख
अश्रू ओघळे डोळ्यातून एका पाहता निसटे सुख
दुसरा डोळा आनंद सांडतो पाहे जाताना दुःख
तिसरा डोळा निरपेक्ष अबाधित सत्यावरती रोख

काळ कल्पना निर्मिली घटनांमधले केवळ अंतर
घटना असे महत्वाची मन गुंतते काळात निरंतर
प्रवाह जाणता नित्य काळाचा तणाव तो भयंकर
भूत भविष्य वर्तमान सोबती काळ चाले समांतर

आत्मिक तत्व जीवन पाहे खिडकीतून काळाच्या
जीवनास पूर्ण विराम मिळता द्वारी ते शाश्वततेच्या
जिथे काळ मिटून डोळे नांदे साक्षीस अनंताच्या
काळ असे समाधिस्त पल्याड साऱ्या घटनांच्या

# सहिष्णुता

बळ एकवटले कडव्या सिद्धांताच्या मुठीत
तलवारीचे लखलखते पाते चमकदार रणांत
सत्याचे अंश दाविती उग्र गुपित तळपण्यात
रक्ताचे लोट वाहती एक सत्याच्या आग्रहात

तोफगोळे आदळून फोडती परश्रद्धेचे बुरुज
आपलीच श्रद्धा खरी खरे आपले रीती रिवाज
करुणा प्रेम शांती यांची नसे तयां मुळी काज
सत्य केवळ आम्हा गवसले तो अमुचा आवाज

श्रद्धा नेहमी घडत जाई जे पटत जाई अंशाने
पूर्ण सत्य ते कुना ना कळले प्रकटे ते अंशाने
सत्य कळण्या हवी साऱ्या दार्शनिकांची प्रमाणे
बळे जिंकता हारे आत्मा विश्वास तयांचा भंगने

असंख्य वाद विवाद असती सत्याच्या अंगांचे
सारे काही मार्ग दाविती एक जीवन उत्थानाचे
चीर मूल्य जगण्याचे दावी दया करुणा प्रेमाचे
स्पष्ट होई सत्य अधिक ते सूर जुळता इतरांचे

# शेतकऱ्याची आत्महत्या

वरती पाहता श्वेत ढगांचा तुकडा एक दिसला
पाणी नाही त्यात तरीही फसवत तो दूर गेला
आशेचा किरण एकला क्षीण कसा मावळला
असा कसा आयुष्याने गळा माझा आवळला

दिशा साऱ्या आखडून गेल्या संघर्ष  तो कसा
अंतरातला सूर्य हरवला मनास सावरू कसा
प्रत्येक क्षण डसतो आहे पल्याड जाऊ कसा
एकच चित्र समोर येते जवळ केले मी फासा

मी पेरतो मीच उगवतो करी कसाई शेताची
जीवन देई मी दुज्यांना करी ना पर्वा कशाची
अन्याय कुनाला नसे काळजी माझ्या पुंजीची
मीठा संगे खाई भाकर तोंडी तिखट मिर्चीची

दगडाला शेंदूर फासून घालतो मी साकडे
सरकार वा समाज पाहे नगण्य आम्हाकडे
तुटपुंजी हि अशीच रोकडी मदत पदरी पडे
किरकोळ भाव असे अमुचा हेच आमुचे रडे

सुर्याकडुनि उधार घेईन किरण ते आशेचे
वाऱ्याकडूनि थांबवण्यास झुलणे नियतीचे
करिन विसर्जन दुःखाचे मी घामात स्वतःचे
अर्थ माझ्या जगण्यास असे अन्न निर्माणाचे

आयुष्य असे काळी माती संगे काळी नियती
निसर्गावर आशा सोडली आता कशाची भीती
निसर्ग सारे देतो घेतो तोच दैवी लहर प्रचिती
ऊन पाऊसा आसरा तो सांभाळे जीवनज्योती

# विज्ञानदर्शन

विज्ञानाने दाविले मानवा ज्ञान प्रत्यक्ष
तत्पूर्वी प्रमाण होता एक मनाचा अक्ष
कणाकणाने ज्ञान रगडून करून ते भक्ष्य
झगडत राहती असंख्य त्या ज्ञान्यांचे पक्ष ।।१।।

दोन डोळे जे ना पाहती पाहे मनचक्षु
मुक्तीच्या मार्गावरती जाती ते मुमुक्षु
सारे काही सोडूनि केवळ होती ते भिक्षु
तृष्णा असे सत्य जाणऱ्या ते खरे बिभूक्षु ।।२।।

ज्ञान होते इंद्रियांच्या खिडकीतून पाही
मर्यादा पडती त्याला पल्याड असे काही
विज्ञानाने यंत्र दिले बंधन तयाला नाही
साऱ्या ज्ञाना प्रमाण मिळे साक्ष तेचि राही ।।३।।

तत्वांच्या चिंतनाचा ना होवो यातून लोप
काव्याच्या तुषारांचे सिंचन होवो अमाप
कोण उरते चिंतन हवे गाढ लागता झोप
अतीवापर विज्ञानाचा करी निसर्गाचा कोप ।।४।।

गरजा भागविण्या असे विज्ञान हाताशी
जगणे झाले सोपे आता संघर्ष कशाशी
ज्ञानाचा संपर्क वाढला असंख्य दिशांशी
सत्याचा प्रवास न थांबो संघर्ष स्वतःशी ॥५॥

विज्ञानाने क्षितिज दिले अफाट चिंतनासाठी
रुंदावत ते जात आहे मनस्वी बहरण्यासाठी
सुख अन वैभव मिळाले सुंदर जगण्यासाठी
गवसणी घालुनी करा चिंतन अनंतासाठी ॥६॥

# दारुड्याची बायको

गटारातून लज्जित होऊन लपतछपत येई घरा
कशी मी सांगू साऱ्यांना हा असे माझाच नवरा
प्राशन मात्र चालू असते दिवसाच्या प्रत्येक प्रहरा
शुष्क जीवन वाळवंट ते केले माझ्या संसारा

धगधगत्या मंदिरे मध्ये बर्फ जणू उकळून निघते
कंठात आग ती ओतून घेता भान सारे हरपते
लाल कुंकू भाळीचे कसे रक्ताळून जणू गेले नाते
नशेत राहून सदैव दुसऱ्या जगात अस्तित्व जगते

तारतम्य उरले नाही कठोर बोलणे विक्षिप्त
आपुल्याच छंदात एकटा घरी येता आप्त
कशी हि वृत्ती त्याची स्व नशेत असता तप्त
मच्छ जणू तडफत राही दारू न होता प्राप्त

मदिरेच्या आघुरी देवा तुझे कुंड ते जठर
त्यात आहुती देता दारू अवयव होती ठार
पिपासा ती वाढत जाई अंती होई कहर
लालसेची लाळ आणिक उध्वस्त संसार

# निसर्ग

बीजकणांच्या विस्फोटातून जन्मला निसर्ग
स्वयंलीलेने शोधला त्याने नटत त्याचा मार्ग
गुण गणित थोर असे कैक निर्मितींचे सर्ग
कोटी जीवांना जन्मा देऊन केले असंख्य वर्ग

साऱ्या जीवा भासे ते स्वतंत्र विश्व जन्मा आले
दुसऱ्यांपेक्षा भिन्न अन नित्य नावीन्याने भरले
काळा मध्ये डोकावण्या आयुष्य मोजके दिले
निसर्गाच्या विविध कलांनी जगणे जणू भारले

आकाशी तारका नटल्या आणिक चंद्र तारे
झाडा फुलांनी गजबजले, मंद सुगंधी वारे
सागर असे अगाध जेथे मत्स्य सृष्टी विहारे
एकमेकांवरती जीवन साऱ्यांसाठी आधारे

निसर्ग देतो निसर्ग घेतो अफाट असे सारे
संतुलन साधता संयमे साऱ्यांचे पोट भरे
पूर्वनिर्मित वापरा नित्यनवीन बनवा करे
निसर्ग देई विपुल बीजे ज्यातून वृक्ष उभारे

सृष्टीचा पुत्र मानव तया ठायी वाढे हाव
गरजांसाठी त्याने घातले वृक्षावरती घाव
जलात रसायन मिसळून त्याने मारले जीव
हरित धरती मिटवत गेला येई त्याची किव

संवर्धन त्याचे होण्या आता नवा मार्ग धरू
वृक्ष लावुनी जेथे तेथे संवर्धन त्याचे करु
आता मानूया निसर्गाला धर्म आणि गुरु
तोचि पिता माता त्राता मनस्वी प्रेम करू

# दर्पण

स्वतःस जो मी पाहू शकेना दावी ते दर्पण
आभासी ते चित्र असे परी सत्याचे दर्शन
कोण उभा समोर त्याच्या करी तो वर्णन
किरणांचा डाव असे करी प्रतिमा निर्माण

मनात माझ्या दोन भाग मांडती दोन बाजू
निर्णयाप्रति ते बाजू मांडता मी पेले तराजू
दोन मनाच्या विरुद्ध प्रतिमा लागतात गर्जु
सत्य शोधन्या अंतरातला शंख लागतो वाजू

स्वत्व स्थापिते देहातील या चिरंतन चेतना
चेतनेचा वेध घेता स्पर्शी शाश्वतता या मना
तेथून सारे जगत दिसे केवळ एक कल्पना
जगत सारे दर्पणातली भासे एक घटना

असंख्य आरसे जगत सारे पाहती अंशाने
सत्याची असंख्य रूपे ती स्व प्रकाशाने
सत्य अथवा आभास तो जाणावा तुलनेने
विसर्जित स्व होता बाजू बदलती **दर्पणें**

# स्वप्न

असे कोण मी कुठे जन्मलो नसे तयाला अर्थ
स्वातंत्र्य मला स्वप्न पाहणे अन करणे ते सार्थ
कैक पिढ्यांनी अंकुर पेरले स्वप्नांना  तत्वार्थ
त्या तत्वांना प्रकट करुनि शोधी मी पुरुषार्थ

स्वप्नांचे सामर्थ्य वसे प्रेरणांच्या गूढ मुळाशी
प्रेरणेचे पंख लावुनी उड्डाण घेइ मी आकाशी
वेळ येता झेपावण्यास अंतरंगी मार्ग प्रकाशी
पायदळ मी तुडवत असता काटेरी रस्त्यांशी

आशा प्रकटे अंतरातुनी एके दिवशी पूर्तीची
झेपावताना जरूर तयारी निराशेच्या गर्तीची
जरी नसे आस जीवाला पैसा आणि कीर्तीची
भीती नसावी प्रार्थना सदैव असावी स्फूर्तीची

वास्तव असे संघर्ष सततचा स्वप्नांचा सोबती
कधी उडावे कधी पोहुनी चालावे ध्येयाप्रती
ध्येयाला कर्मास बांधुनी नित्य करो निर्मिती
उद्देश जीवना असे जो विचार आपुला देती

# खगोल

डोक्याखाली उशी हाताची आभाळ वरती दिसे निळे
नभी मंद तारका दिव्य झळाळी नजर तिथून ना वळे
विचार शृंखला स्तब्ध जाहली अबोल अंतरी आकळे
अव्यक्त मनोगत चंद्रासोबत जो अजाण खेळी खेळे ।। १ ।।

तारकांचे त्रिकोण वा चौकोन तयांच्या अगणित मिती
श्रांत डोळे विश्व पसरले अनंत आकाशा संगे खेळती
आभाळ खगोल दृष्टीत साठले निद्रा असे ना जागृती
अंतरातून उसळते चांदणे येई मुक्त मनास भरती ।। २ ।।

असलो जरी लहान बिंदू अफाट विश्व अनंता पुढे
मनी सारे विश्व उतरे स्वतःस विसरतो एकात्म धडे
चांदण्याचे दर्पण चित्ती दुर्लभ दर्शन स्वतःचे घडे
वेदनांवरती मलम चांदणे फुंकर गार वाऱ्याची पडे ।। ३ ।।

अद्भुत गूढ रम्य आभाळ शाश्वत चीर त्यात वसे
स्फुरणात सारे विश्व आकारे कृत्रिमता त्यात नसे
भव्यता ओसंडून वाहे प्रवाह आकाशी गंगा असे
अगम्याच्या गळयात दीप्ती माला तारकांची भासे ।। ४ ।।

# मौन

एकटा मी माझ्याशी एकांती मौन धरिले
उमटल्या शब्द खुणांना निःशब्द पाहिले
तरंग होते भावनांचे चित्त कुपीत न्हाईले
नाद हळूच उमटला गीत स्तब्ध गायिले

आकाश मुक्त दिशा फाकवूनि राहिले
शब्द त्यात वार्यावरती हळूच स्वार जाहले
स्वरकंपात कर्ण कंप अंतरंगी उकलले
स्मित लहर वदनावर वेदनेस विसरले

जगात मी एकटा प्रवास हा एकट्याचा
शरीर मी पांघरले पुढे मार्ग काट्यांचा
पसारा प्रेमाचा भार भरल्या पेट्यांचा
एकला मार्गस्थ मी काळ तो कसोट्यांचा

श्वास तो चालवी जगण्यास या शरीरा
अंतराशी भिडून देई जगण्याचा वारा
प्रकटे अनुभूती कोसळे पाऊस अन गारा
प्रवास तो अगम्य असे हा सृष्टीचा निवारा

# अंधश्रद्धा

मर्कटांचे  चित्कार सांगती संकटाची खून
बाकी प्राणी ठरवती सिंह येईल त्यावरून
उत्क्रांतीच्या टप्प्यातली चिन्हे दावी अंतर्मन
भीती, दुःख, धोक्याचे शकुन सांगे आगमन

लाल रंग शुभ फळे समजा देई कुना साठी
मनात तो करेल त्याच्या भक्कम खुनगाठी
भय तयाला ना गाठे विश्वास तयाच्या पाठी
लाल रंग तो धरून ठेवी घट्ट मनाशी कष्टी

कधी काय होईल याचा कुणीच ना दे भरोसा
तरी चिन्हांवरून माणूस मांडे तर्क अंधारसा
कधी योग येति जुळून विश्वास वाढवी विश्वासा
विकल मन होऊन जाई सतत अंध त्या ध्यासा

गारठून जाईल मन तडा जाता विश्वासा
अशक्य असे कुठे शोधणे दडला तो ठसा
अरण्यातील प्राण्यांचा कसा घेतला वसा

प्रश्न करा विश्वासा मांडा खरे खोटे गणित

जागे व्हा खोलात जाऊन मनाच्या गुहेत

खोडुन काढा संबंध बनले भीतीच्या माऱ्यात

विचारांना प्रकट होऊ दे बुद्धीच्या सहाऱ्यात

भय चिंता मुक्त होता मन होईल प्रसन्न

प्रसन्न मन कर्मास घडवे दोष जाती निघून

भीतीच्या सावटात राही सदा मन विषन्न

निर्मितीत प्रतिबिंब स्वतःचे स्वच्छ दिसे पूर्ण

# किन्नर

सांग देवा गुणसूत्राचे गणित तुझे का चुकले
नसे स्त्री वा पुरुष आम्हा असेच का तू केले
समाजाच्या उतरंडीवर आम्हास का फेकले
माणसांच्या हिशोबात तू आम्हा का वगळले

भ्रमर घालती पिंगा फुलां च्या अवती भोवती
परागावीन आम्हास ठेवले बांधून देठावरती
ते देठ सुद्धा विसरून जाई नाळ वृक्षा प्रति
शापित पुष्प ते सदैव दावे भयाण ही विकृती

काम देव सहज लावे काम बाण प्रत्यंचेला
पक्षी रव तो बोलावे मिलनासाठी मादीला
निसर्ग ऋतू आम्हास वाटे विसरूनी गेला
असह्य तो अभाव गमतो एकाकी मनाला

आम्ही आमुचे ठरवू आता अमुचाच वेष
सवंगडी ते अमुचेच ठरवू अमुचाच देश
खुंटी नसे वा खळगी तोच अमुचा ईश
आम्हीच ऐकू अमुचा आपसात आक्रोश

नका हिणवू आता भीक आम्ही मागता
तृतीयपंथी मार्ग आम्ही खुशालतेणे जगता
वर ना आमचा जाये वाया दानधर्म करता
नका घाबरू,आम्ही मानव,टाळी तुम्हा देता

अन्यायाचा तराजू पेलेल का देवतेला?
समान दर्जा आमच्या येई का नशिबाला?
कामात आम्हा घेऊनि स्वतंत्र अर्जनाला?
कुणी ज्ञानी देईल का अर्थ या जगण्याला?

# स्वेच्छामृत्यू

बेफाम यातना होती शरीर नामक यंत्राच्या
बांधुनी पिशव्या फेकून देई अतृप्त इच्छांच्या
विक्षिप्त वेदनेने याचना करी यम दूतांच्या
करी कट्यारीची मागणी शय्येवरती मृत्यूच्या

कुणास होते तृप्ती आणिक इच्छा नाउरती
सुखांची अन दुःखांची ओहोटी अन भरती
उभे किनारी राहून ते निश्चलतेने बघती
प्राणरूपी पक्ष्यासह ते उडून जाऊ पाहती

का टाकावे सगे सोबती स्व कारणी संकटी
सन्मानाने मृत्यू येता का धर्म नीतीची काठी
वाहते ते जीवन अन थांबता तो मृत्यूच कष्टी
कायद्याने द्यावी कसोटी विराम देण्या साठी

जीवन असे घटना केवळ उद्देश नसे त्यास
प्रक्रिया ती असे केवळ हर्ष, दुःख भोगास
मुक्तता प्राप्त व्हावी जयांचे जगणे कारावास
न्यायाने ज्यांना वाटे द्यावे आलिंगन मृत्यूस

# समाज

पठारावर समाज येण्या उतरंडी वरूनी
वाद अथवा भेद सारे क्षणात विसरुनी
सारे जन एक होऊ हातात हात घालुनी
एकसंघ बलवान करू समाजाची उभारणी

इथे जन्मले ऋषी मुनी अन बुद्ध महावीर
प्रवाह तयांचा मिळुनी होई महासागर
उद्देश दिला जगण्याचा तपूनिया घोर
दर्शने अनेक जन्मले सत्य ज्ञान ते चीर

असू आम्ही साधक कुण्या एका दर्शनाचे
परी करू सन्मान आम्ही साऱ्या संप्रदायांचे
विवाद आम्ही अवश्य करू साधन संवादाचे
मिसळून आम्ही साऱ्या देऊ आलिंगन प्रेमाचे

कुणी नसे लहान आम्ही समान समाजात
वैश्विक असे परंपरा हि आम्ही एक त्यात
उपासना ही मार्ग आमचा असे व्यक्तिगत
सत्य शोधणे सत्य वागणे अंती होऊ मुक्त

# पोकळी

सहस्त्र हिऱ्यांचे दागिने मढवून
एक शरीरधारी मऊशार गालिच्यावर
रिकाम्या मनाने लोळत होता
ना तो दुःखी होता ना आनंदी
तसं पाहिलं तर दोन्हीही
भौतिक सुखात म्हटलं तर आनंदी
मनात हरवल्याची सल कुठेतरी
गादीवर लोळणाऱ्या शरीराला
टोचून जात होती म्हणून दुखी
काहीच ध्येय नव्हतं म्हणून
किंवा असल तरी फक्त पैशासाठी
एक पोकळी तयार होत होती
छातीवर दामटून बसल्यागत
पोकळी वजनदार होत होती
त्याचा श्वास गुदमरत होता
त्याने सारे दागिने काढून टाकले
रानात गेला जमिनीवर झोपला

झाडाच्या खोडाला टेकला

त्याच मन भरलं

आत एक शांत लहर उमटली

पोकळी रिकामी झाली

हलकीशी सर येऊन गेली

मातीचा सुगंध आला

त्याने तो छाती भरून घेतला

पानांची सळसळ बोलू लागली

मन पक्षी बनून उडू लागलं

निळ्या आकाशात समग्र दिसलं

तो स्वतःशी बोलू लागला

बोलता बोलता तो त्याला सापडला

# निर्वाण

शून्यासम एक बिंदू असंख्य त्यातून संभावना
आकाश नव्हते, समय ना साक्ष तयाची कुना
स्वयंस्फूर्त अती स्तब्ध तयाचा स्वामी दिसेना
अगम्य अमित अतर्क्य जो अस्तित्वाच्या विना

बीज होते गुप्त तयाच्या सूक्ष्म पोटी अनंताचे
सामर्थ्य गूढ अवकाशाला दिशांत फेकण्याचे
त्रिकाल होता दडला तेथे साधन हो मापनाचे
ऊर्जा होती असंख्य लहरी अन मूळ द्रव्याचे

नायक श्रांत गणनेचा सारे कसे अगणित होते
बिंदू मध्ये अनंत मात्र शून्यामध्ये दडपत होते
शून्याची मिठी होती कवेत अनंत नांदत होते
समाधीत निर्वाणाच्या अनंत मात्र डोलत होते

"प्रथम क्षणाचे आगमन होता बिंदूस ते गमले
विस्फोटातून एका तेथे विश्व उदयास आले
प्रक्रिया जी आरंभ झाली फिरत सारे राहिले
काही आले काही गेले जीवन कुठे आरंभले"

सारे काही भोवती फिरते भास मी ला झाले
त्यातून सुख आणिक दुःख दोन्हीही जन्मले
सारे काही मी वर घेऊन जीव येथे अडकले
प्रक्रियेस ना समजता मन असे भयाण झाले

निर्वाण जाणवे जगत सारे घडते कारणांनी
मी हा आभास असे टाकी ग्रासून विकल्पांनी
धावत राहे मानव येथे अज्ञानाच्या कल्पनांनी
प्रक्रियेत विरुन जाता स्वच्छ दिसे निर्वाणी

# प्रकाश बिंदू

कंदिलाच्या काचेत श्रांत ज्योत
ध्यानस्थ निःश्वास होती तेवत
हिरवं बुबळ आंतरात वळवत
अशीच वाटते राहील शाश्वत

हेलकावा हवेचा येता किंचित
पुनः ती खेचते त्याच स्थितीत
तो सावध पवित्रा होतो प्रतीत
अढळ मग्नता ना हो विचलित

पाहते ती स्वतःच्या प्रकाशात
अस्तित्वाला जणू मनी सतत
दीप होती ती गहन तिमिरात
शून्यात पाहून ती होती विझत

प्रकाश बिंदू एक अधांतरात
मुक्त तिला करत होती वात
निःशब्द उरला हवेचा झोत
भरून ती विझली ओतप्रोत

# त्यक्ता

नर नारी नटेश्वरासम नाते स्वप्नी बाळगले
नियतीने घन घावामध्ये मूर्तिस त्या दुभंगले
जीवनाच्या सरितेत मी कशी फेकले गेले
तरण्याच्या धडपडीत जगणे विसरून गेले

सामाजिक माध्यमांतुनी संबंध बांध\ले गेले
तरुण चित्र ते पाहून मी कशी भाळले गेले
वास्तवात वयस्क तो तरी मी गोंधळून गेले
अमेरिकेत येण्यासाठी नाटक त्याने रचले

येताच आम्ही दोघे तेथे तो झाला अरेराव
सोबत जरी असले तरी नसे प्रेमाचे नाव
महिने काही सरले नि त्याने सोडला गाव
पुन्हा ना संबंध ठेवले ना कळाला ठाव

त्यक्ता मी झाले होते रडले रात्रंदिवस
पुन्हा तो येईल याचा होई मजला भास
अबला मी भविष्य पाहण्या मोजली रास
तेथेही साधू रूपात लुटले मजला राक्षस

कठीण या स्थितीत नसे कुटुंब पाठीशी
रुदन सदाचे बनून गेले नाते एकांताशी
एक मित्र वाटला जणू भिडला हृदयाशी
अलोट भावना समर्पित केल्या त्याच्याशी

प्रेमासोबत व्याकुळ शरीर झाले भुकेले
परी शुद्ध मित्राने नाते मजशी अव्हेरले
अतृप्त माझ्या मनाला घाव गहिरे बसले
त्यातून निघण्यासाठी मी संन्याशी झाले

आता मज रित्या राहिली ना शरीराची भूक
वेदनांची सवय झाली ते सोसण्याची मूक
रडणे सुद्धा सोडून दिले वृथा होणे भावुक
विरक्त मी त्यागून दिले त्यातही असे सार्थक

कित्येक अशा असती त्यक्ता सहती मुकाट
भक्ष्य त्या पडती कधी ज्या वाटती मोकाट
सतत माथी घेऊन फिरती भीतीचे सावट
असेल का वेदनांस त्यांच्या मुक्तीची वाट

# न्यूनगंड

विनोदात त्याला चिडवत परिवार सगळा
मूळसुद्धा धरले नाही इतका तो कोवळा
समजत असे नकटा इतरांपासून वेगळा
दर्पणात पाहता उगाच येई तीव्र उमाळा

मित्रांमध्ये जाण्याची लाज तयास फार
भावनेचा भार ते करतील का स्वीकार
विश्वास तयाचा लोपला रोग जणू घोर
व्यर्थ आपुले असणे तो सदैव धरी विचार

सतत राहून एकटा अंतर्मुख तो झाला
पुस्तकांची मैत्री करुनि शब्दवेडा बनला
एकतार वाचनाची वाजवत तो राहिला
रिता बाकी राहून त्याला एक सूर गवसला

कसा सापडावा मार्ग, घेऊन हाती एकतारी
सप्तसुरांनी भरावी या जीवनात सुमधुर वारी
अवसाद वृत्तीमध्ये राही तऱ्हाच तयाची न्यारी
स्वतःबद्दल केवळ कल्पनांची घेई भरारी

वेदनेच्या मुळात दडले असे स्थित्यंतर
बदलण्याचा मार्ग दिसतो चिंतूनि निरंतर
पुढे भरारी घेण्यासाठी मिळे बीजांकुर
एकांताशी नाते जोडता, मिळे शक्ती थोर

जपून बोला लहान पाडसा बीज ते पेरती
प्रेमाच्या बागेत फिरवा गोड गीत ते गाती
थापटून अन कुरवाळून निर्भीड ते होती
नको तुलना, मार्ग दावा करो ते निर्मिती

मार्ग तयांचा निवडण्यास ते होउदे स्वतंत्र
विकास आणिक सत्य, बनो तयांचा मूळमंत्र
शब्द नव्हे वर्तन तुमचे, होई जगण्याचे तंत्र
जीवनाला दिशा मिळो, असावे तेच त्यांचे अंतर

# भिकारी

डोक्यावरचे छप्पर गेले तेथे आले आभाळ
भिंती साऱ्या लोपून गेल्या भिडली वावटळ
रस्त्यावरती आलो आम्ही नसे घराचा तळ
देवाच्या दरबारी मांडला हा संसाराचा खेळ

कसे निसटले धन आमुच्या हातून ते ना कळले
कुणी भर बहारात असता नकळत मरगळले
कुणी काही कडवट क्षणी कुटुंब सोडून गेले
कुणी मनाच्या भ्रमात राहून एकाकी पडले

अन्नालाही वंचित आम्ही अशक्त अन आजारी
रिकामे अन आळशी हा शिक्का भाळी मारी
मनात आमुच्या खड्डा पडला मिळे ना उभारी
आधार आम्हा नच कुणाचा रीत जगाची न्यारी

शरीर अन मनावरच्या वागवता जखमा चीर
गहण दुःखावरती शिंपडे कधी नशेचे नीर
औषध आम्हा ना मिळे ना मिळे कुणाचा धीर
उपहासाच्या नजरा आम्हा सदैव मारती तीर

भिकेत सुद्धा हप्ता घेती गुंड आमच्या पाठी
उपेक्षित समाजातले आम्हा नसे रक्षना काठी
'अ ' गिरवता येई ना शाळा आमुच्या साठी
कसे जगतो माय बाप हे शब्द घेऊनि ओठी

कुणी हात देउनी आम्हा येईल का आधारा
छोट्या वस्तू विकून आम्हा होईल का सहारा
स्वास्थ्य शिक्षण संरक्षण येईल का आमुच्या दारा
मरगळल्या आम्हा प्रकाश देईल का उधारा

# कुटुंब

रेशीमगाठ हि प्रेमाची, लक्ष्मण रेषा मर्यादेची
जपणूक येथे हिताची, बांधणी हि विश्वासाची

आधार देई संकट समयी, शक्ती असे ती पाठी,
शुश्रूषा आजारपणी, हक्काची ती असे कुटी

घट्ट नाते रक्ताचे, त्याहूनि श्रेष्ठ हृदयाचे
संबंध जेथे जिव्हाळयाचे, लाडाचे अन मायेचे

प्रेरणेचा श्रोत असे, असे प्रगतीचा मार्ग खरा
स्वप्न आकार घेई इथे, आत्मशांतीचा देव्हारा

कधी अश्रूंचा प्रवाह, कधी हास्याचा कल्लोळ
किती जपावी नाती, किती पिढ्यांचा तो मेळ

वाद होती किरकोळ, कधी रुसवा फुगवा
भावनांचे नियमन, येथे नांदतो गोडवा

लग्न बंधन होई घट्ट, देई साऱ्यांना निवारा
जीवनाच्या प्रवासात देई साऱ्यांना सहारा

# धूम्रदैत्य

बळे फुंकण्या लावी मज मित्रांची संगती
रुबाब पाहे वडिलांचा तोंडात नलिका धरती
दूरदर्शन मालिकांतील नायक तेच दाविती
धूम्र राक्षस बसला होता मानगुटीवरती

ताण तणाव वाढत गेला कसे कळले नाही
काही काळा करीता विचार होती प्रवाही
आराम मिळे मेंदूला उत्तेजना थोडी राही
दृढ धारणा मनात होऊन बळावत जाई

तोंडातून धूर सोडता आपण कुणीतरी वाटे
मेंदूमध्ये गुदगुदीगत झिंग येऊनी दाटे
विसरून क्षणांत ताण सारा आनंद तेथे साठे
समव्यसनी मित्रांशी गप्पांचे असंख्य फाटे

हळू हळू फुफुसांमध्ये साठत होती राख
सर्दी अन सतत खोकला नाड्यात पसरे विख
कर्क रोगाचे लक्षण मनाला मारतसे डंख
क्षणोक्षणी मधुर दैत्य तो पसरत होता पंख

उग्र माझा वास टाळत कुटुंबात सारे चिंतीत
सतत टोमणे खाऊन प्रेमा झालो मी वंचित
सारा पैसा पाण्यात जाई रोग होता कदाचित
एक संपता दुसरी घेई पूर्ण बुडालो व्यसनात

इच्छा होण्या आधी वाटे तेच वाटे पूर्ती नंतर
दोन बिंदू मधले किंचित विसरून जावे अंतर
मधल्या काळा का गहाण राहावे केला विचार
परिवर्तन मनात झाले बिंबला विचार तो थोर

मनी म्हणालो धूम्र राक्षस नसे बसला धुरात
असेल तो जरी वसला केवळ दुबळया मनात
सक्तीचा तो विकार रुजतो जखडे दोर पायात
समजावून ते ज्ञान मनाला व्हावे आपण मुक्त

एकदा मी फेकून दिली ती सवय सक्तीची
क्षण मोजिले क्रमा क्रमाने आठवण मुक्तीची
दिवसा गणिक वाखाणणी मनाच्या शक्तीची
पीळ मनाचे उकलले प्रशंसा झाली युक्तीची

# विवर

मुक्त नाही चंद्र सुद्धा विवर पृष्टावरती खोल
दिव्य किरण निघत असे डागाळला जरी गोल
मनास देती त्याची उपमा लोक बोलती बोल
सुख दुःखाच्या स्मृती शोषून घडत जाई वेल

मनात पडले खोल खड्डे दुःख अन भंगाचे
पीळ काही उकलेना अंतरीच्या जखमांचे
बुरुज होते खंबीर तरी तडे पडती तोफांचे
भग्न उभा कंपित जागी जगणे वैफल्याचे

जरी खुणवतो छंद वा उद्देश उतुंग
तया मागे लागून होई जीवन तुटका पतंग
कसे अन कुणास सांगू अदृश्य जखमी अंग
मन कुणा दिसे? फक्त अदृश्य लहरी तरंग

किरण कुठे निर्माण होई का आशेचा फिकट
कि असेच ठेवीन मजला मी निराधार भटकत
आशा सुद्धा गाढून गेली विचारांच्या भारात
कसे शोधू स्वतःस मी अपेक्ष्यांच्या ओझ्यात

मी केवळ पोकळ सारे ओझे देतो टाकून
जीवन केवळ प्रक्रिया समजून चालत राहीन
मीत्व जाणीव टाकून देता ना उरे घेणे पोळून
नेणिवेत वागती वेदना अन अदृश्य जाणवे मन

मुक्ती मिळावी साऱ्यामधूनी दावी मजला दिशा
का टोचत राही जगणे मजला मनाच्या त्या दशा
का मिळत नाही मार्ग मजला फेकून देई पाशा
असे प्रतीक्षा केवळ आता उगवो जीवन उषा

# कर्मसन्मान

फुले, खेळण्या, पुष्पगुछ हाती घेऊनि विकती
आगगाडीच्या डब्यात अन पादपथावर भेटती
कळकळीने वस्तू घेण्या आर्जव अती करिती
मळकट पारशे पाहून त्यांना सारे झिडकारीती

भीक नव्हे स्वाभिमान ते कठीण जगणे जगती
कधी हातात पेटी घेऊनी सूर सुंदर वाजविती
पोटासाठी दिवसभराच्या कसे बसे मिळविती
भुकेपल्याड गरज त्यांची ते कसे घेऊनी जाती?

क्वचित दिनी आम्हा मिळते दिवसापुरते खाण्या
कधी ऊन प्रखर पडते कधी पावसात न्हाण्या
आभाळाचे पांघरून आम्हा थंडीपासून वाचण्या
गरीब आम्हा रस्त्यावरचे समाजात हिणवण्या

राव आणिक रंकांमध्ये खोल असे ती दरी
लाज वाटे लोकांना आम्हा बसवता शेजारी
भीक नसे स्वाभिमान हा रीत आमुची न्यारी
सन्मान देउनी संघर्षाला होतील का कैवारी

# श्रद्धा

तर्काचा घेऊन रवी विचारांची घुसळण
भावरस मनात वाहे श्रद्धा होई निर्माण
उपकारी ती मनास तिला तुपाचे प्रमाण
चिन्हांकन ती चारित्र्याचे असे परिमाण ॥१॥

मन असे अधांतर, स्व स्थापला तयात
स्व रोवतो घट्ट तया श्रद्धेच्या गाभ्यात
श्रद्धा मीळवे पुष्टी स्मृतींच्या अंगणात
श्रद्धाहीन मनी स्व भटके अधांतरात ॥२॥

श्रद्धा होता आंधळी गढूळ डबके होई
कधी ना होई घुसळण तिची दुर्गंधी येई
रुतला स्व सक्तीने तिच्यात घेरला जाई
विस्कटून मनास टाके अधोगतीस नेई ॥३॥

डोळस श्रद्धा दावे मार्ग अंतिम सत्याचा
दीपस्तंभ असे इच्छूकां आत्म उत्थानाचा
जाणण्यास गृहीतक जगण्याच्या कोड्यांचा
कोडे सोडवत जाता शोध लागे सूत्रांचा ॥४॥

कुणी देती नरबळी विकृत श्रद्धेच्या पोटी
आरंभींती अघोर कर्मे त्यांच्या देवासाठी
स्वार्थ आपला साधण्या देवास धरती वेठी
सक्तींची सवय लावती श्रद्धा जपण्या खोटी ।।५।।

श्रद्धा देई नियम सचोटी वागण्यास नेकीने
भीती देई तया उल्लंघता विपरीत हेतूने
आनंद शांती देई तया श्रद्धेत जगता निष्टेने
द्वंदात पडता श्रद्धा देई नाद आतला न्यायाने ।।६।।

निर्माती ती संस्कृतीची निकष विपुल देउन
सभ्यतेच्या खून गाठी बांधून करी नियमन
मागोवा घेता संस्कृतींचा झळके तिचे पान
समाजाच्या मनात तिचे असे दिव्य अधिष्ठान ।।७।।

नका करू सीमित तिजला पंथांच्या द्वारात
मुक्तपने स्वीकार करावा एक मानवजात
विज्ञानाने शोध लावता जावे तिच्या मुळात
नवीन श्रद्धा स्वीकारावी अति स्पष्ट विचारात ।।८।।

# तारकांचे बोल

अगणित तारका मोजुनी ना संपल्या
गूढ आकाशात त्या अशा कुणी शिंपल्या
मिणमिणत्या पाहता त्या लाजुनी लपल्या
विस्मय विपुल खेळात त्या कधीच ना हरल्या

वेध तिन्ही काळांचा स्थितीतूनी कळला
शाश्वताच्या शोधात कसा मानूस हरवला
वाटसरू तारका पाहुनी मार्गी लागला
तारांकित आकृती शिशु पाहुनी हसला

अनंताच्या पटलावरती खुणा अंतिमाच्या
सत्याचा मार्ग दावण्या विशाल जाणिवांच्या
दार्शनिक सूर्य तळपे असे छटा किरणांच्या
मनाचा स्वामी शीतल चंद्र संगे चांदण्यांच्या

विश्वाच्या कणांत नांदते धरती एक गोल
तिच्या मांडीवरती रांगते मानव तिचे मूल
स्वप्न तयाचे विश्व गवसणी आकारते विपुल
तारकांचा मेळ देई नाविन्याची चाहूल

# क्षितिजापल्याड

आभास असे क्षितिज त्या पल्याड स्वप्न वसे
सूर्याच्या किरणांसवे पडती त्याचे कवडसे
रात्र होता दुधाळ चंद्र स्वप्नास पुष्टी देतसे
मधाळ आशा पल्लवी तारकांमधून भासे

पंख मी पसरले उड्डाण घेण्या पार क्षितिजा
अंतरंगी अज्ञात शक्ती देई उल्हास ताजा
आव्हान मेघांचे आहे आकाश आणि वीजा
एकटा मी विश्व एवढे मीच मनाचा राजा

गूढ अंधाराचा करे नियती भयभीत निर्देश
दुःखाचे गीत गाई ती काळा घालुनी वेष
वेदनांच्या सुया टोचती स्मृतींचे अवशेष
सारे आता झटकुनी आणतो पंखात आवेश

काटेरी गुलाब होते गुच्छ गुंफला खास
यश वा अपयश देती दिवास्वप्नांचे भास
कंपीत कधी चित्त माझे विजयाचा ध्यास
स्वप्नांच्या पूर्ती वेळी स्वच्छ दिसेल प्रवास

# वेडा

स्वप्नांच्या मागुती माझे पिसाट धावे मन
माझे असे आभास विश्व मीच करे निर्माण
कल्पना मनात माझ्या रुतल्या विलक्षण
वास्तवात मी का रहावे होई मी बेभान ॥ १ ॥

दोन बिंदू सापडता घडवे आभास त्रिकोण
तिसरा बिंदू घेतो माझ्या आभास पटलातून
कधी आकृती मीच काढतो पूर्ण रेखाटून
वास्तवाचे नियम सारे मी टाकतो भेदून ॥ २ ॥

इच्छांचे सर्प होऊनि डंख मारतीं मजला
त्या सर्पांना झुलवतो गारुडी मी भासातला
विक्षिप्त विंचवांचा थैमान मनात मातला
विष तयांचे गळी उतरूनी हैदोस घातला ॥ ३ ॥

माझे वेगळे विश्व जिथे मी चित्रांस रंग देतो
शिल्प माझ्या स्वप्नातले प्रत्यक्ष मी घडवतो
वास्तवातल्या लोकां वाटे काय मी बरळतो
भासमान विश्व माझे तिथे सुगंध दरवळतो ॥ ४ ॥

लोक मजला दगड मारती अन हाकालती
माझ्या जगती भीषण अति प्रतिमा किंचाळती
कधी होतो प्रहार आतून कधी शरीरावरती
विस्कटलेले अस्तित्व माझे सहन मारे करती ॥ ५ ॥

बेफान मी होता कधी रंगवतो अशीच कथा
मीच नायक होऊनि सांगतो जागवितो व्यथा
पात्रांमधल्या संबंधांच्या मीच रचतो गाथा
कधी फोडतो दुसर्यांचा वा माझाच मी माथा ॥ ६ ॥

भूतकाळी होतो रुतलो मी विकारात इतका
मनाच्या कडा फोडुनी झालो मुक्त भटका
कुणी न घालतील मनास त्या हळुवार टाका
पौर्णिमेच्या चंद्रास पाहुनी लागे मनास चटका ॥ ७ ॥

मन मजला जाणवते एक सुजरा अवयव
सुजरे असती डोळे माझा सुजरे त्यात भाव
आकार माझा विस्कटला वेडा एकची नाव
नका झोडु मजला तुम्ही करा माझी कीव ॥ ८ ॥

# अपमान

शब्द होते अस्त्र झाले जिव्हारी ते खोल रुतले
बाहेर तीक्ष्ण खेचता आतडे उपसत बाहेर आले
अपमान असे ती द्रव्य भावना रक्त जणू स्त्रवले
काळजावर ओरखडे रक्ताळले व्रण उमटले

फेकणारा शब्दास्त्र तो क्रूरतेने फेकत होता
दुष्टपणा किंचितसा आणि राग त्यात बोलता
मर्यादा शक्तीची माझी म्हणुनी घेतली नम्रता
परी ना मनास कळे विचारांची मृदुल शांतता

क्षणात वाटले सोडून सारे जावे एकांती वासा
पळून जाणे जरी ना बरे कंटाळलो मी त्रासा
थांबून तेथे घायाळ होणे अन मनास करे पिसा
मनास कोंडता अन्यायाने बाहेर येईन कसा

काळ असे उत्तर घ्यावे सहनशक्तीचे नवे धडे
जखमांच्या खपल्यांनी केले निब्बर ते कातडे
नवीन आशा उमजली जरी स्वप्नांना जाती तडे
एक दिवस येईल माझा भविष्य त्यातून घडे

वेदनांच्या जागी जन्मती विजयाचे गणित नवे
सहन करुनि सारे काही पुढे पुढे जात जावे
पीळ जरी पडले मना विसरण्यास शिकावे
खोल श्वास घेऊन पुन्हा उमेदीने जगत जावे

आज चा दिवस होईल भूतकाळ तो उद्यासाठी
सुंदर गत काळ वाटतो सुख दुःख जाता पाठी
आवेगास आवरावे उकलावी विचारांची दाटी
प्रगतीचा प्रवाह असतो त्यात येती दगड गोटी

# शांतता

मी एक संघ मनाचा आद्यापासून निर्मिला
भावना ही जादू असे औषध जणू शांतीला
स्व ची जाणीव देई विषय अनेक चिंतण्याला
अस्तित्व माझे हळू हळू लागते उकलन्याला

विचारांच्या सोबत भटके नैराश्य तणाव चिंता
एकाग्र विषय घेऊनि चिंतता निर्णय येई हाता
मौन दुर्लक्षी उत्तेजना दुज्यांचे घाव येति झेलता
शब्द मांडती उच्छाद जेथे मौन साधे शांतता

स्मृतींच्या पटलांवरुनी धाव मनाची वेगे
एकातून दुसरी लागे धरत त्यांच्ये धागे
स्तब्ध राहतो मी ना मनाच्या लागता मागे
धाव मी रोखता एकाग्र शांती ध्यान लागे

शांतता संगीत झऱ्याचे जेथे निसर्ग फुलतो
चिंतनाला असे बैठक शांतपणा जिथे नांदतो
प्रकाश जेथे पडतो तेथे स्व सत्यास शोधतो
सत्याच्या चिंतनामध्ये मौन जणू बोलू लागतो

सुसंगत विचार असती गहण शांतीचे दूत
चित्त जेथे शांती नांदे तिथून पाझरे अमृत
विक्षिप्तता शांत होऊनि हृदय होई क्षिप्त
अंतरीच्या निवांत आनंदी सदा असे तृप्त

प्रार्थना करावी मागण्या शांती असे ते धन
चित्तामध्ये सदैव वसते शांतीचे निःशब्द वन
विकार नांदती संयमी असता निर्विकार मन
अढळ शांतता देई आभा प्रसन्न दिसे वंदन

# घडी

स्मृतींना जागर येता भावनांना उकळी
स्वप्नांच्या देशात जाण्या पायात साखळी
अंतरातल्या प्रक्षोभात आशा होरपळली
कल्पना विराण प्रदेशी भयान ती वळली

गोंगाट नुसता जणू ऐकतो विभिन्न वाद्यांचा
कदाचित तो असावा विस्मृतीतील कैद्यांचा
कोंडलेल्या ध्येयांचा अन अतृप्त भावनांचा
अंतरीच्या कळा दाबता उद्रेक वेदनांचा

ध्यास परी मला असे स्वतःस जाणण्याचा
झरोक्यातून मनाच्या कवडसा आत्म्याचा
पुरेसा असे मज तो मार्ग दावण्या शांतीचा
उधळलेल्या मनास माझ्या श्रोत शक्तीचा

ध्यान माझे असे माझ्याच मुळारंभा वरती
पुन्हा होईन स्वार मनावर स्वप्नांच्या जगती
उजळीन पुन्हा किरण आशेचे आकांक्षापूर्ती
स्वतःच्या अंतरातून मिळवीन पुनः ती स्फूर्ती

# इथेच

इथेच जन्मतो इथेच जगतो होतो इथलीच माती
इथेच मिळवतो इथेच संपती सारे अनुभव स्मृती
इथेच कर्तव्य पार पाडतो विराम घेती साऱ्या कृती
इथेच शोधतो स्वत्व माझे अन झेपावतो आसमंती

कित्येक ऋतू इथे पाहतो अनुभवतो त्यांची स्थिती
कित्येक वर्षा नंतर कळते व्यर्थ जगल्याची प्रचिती
कित्येक काळा नंतर कळते सीमित आपली मिती
कित्येक वेळा हारून सुद्धा करत राहतो निर्मिती

अचंबीत मी होतो पाहता मूळच माझे नसे ठावे
अचंबित वृक्ष सारे जमिनी खाली मूळ असावे
अचंबित पाहुनी जगणे कठीण अनुभवा यावे
अचंबित बघुनी निसर्ग न्याय अन नीतींचे  दावे

अंतास माझ्या काय उरते शरीर जाता एका क्षणी
अंतास मनाच्या नसेल द्रव्य ते उरतील का आठवणी
अंतास साऱ्या श्रद्धांच्या खऱ्या खोट्यांची मापणी
अंतास स्व उरेल का भटकेल कुठल्या वणी

# वृक्षस्वप्न

वृक्षांची सळसळ सोडे संगीत मंद वाऱ्यात
मानवाचा गोंगाट विफळ कर्कश्य माऱ्यात
निसर्गास कळकळ उत्क्रांतीची या साऱ्यात
वृक्ष डोंगर तोडे मानव श्रेष्ठत्वाच्या तोऱ्यात

वृक्षांना स्वप्न कोणते जाता सामोरे ऋतूंना
परोपकार तयात दडला बहार देई फळांना
फुल असे स्वप्न सुंदर नित्य ऋतूंना रंगवताना
निसर्ग नटे सुशांत ऋतूंना पाहता बहरताना

मानवाचे स्वप्न असे उड्डाण घेणे अवकाशी
निसर्गाला खुर्डून तो झाला इथला रहिवाशी
परतावा ना मिळता निसर्ग राहिला उपाशी
निसर्ग शृंखला भंगल्या घाव घालता मुळाशी

जमिनीचे भाव वाढता आरक्षण द्यावे वृक्षास
निसर्ग निवारा वाचवण्याचा घ्यावा निदीध्यास
वृक्ष देती संदेश शांतीचा धरावी त्याची कास
निसर्गातून निसर्गात असे मानवाचा प्रवास

मानवाला उद्देश असावा हरित वसुंधरेचा
सौहार्द निसर्गाशी व्हावा संबंध मानवाचा
मनात होई जागृती तो उत्कट क्षण त्याचा
वसा घ्यावा वृक्षांचा यज्ञ करण्या निसर्गाचा

स्वप्न आभाळाचे ठेवो संवेदना धरतीची
वृक्षांच्या  मुळांना ओल मिळो हृदयाची
वृक्षांनाही स्वप्न असते विपुल हरिताची
मुले आहो आपण सारे एकाच मातीची

# माड

बहरला तो माड वृक्ष संख्यांनी कित्येक वसे
दिमाखदार उंच परी विनम्र वाकला असे
श्रीफळांची झुंड काखी भव्य पर्ण पसरतसे
किमया ती निसर्गाची नारळात पाणी कसे

अरण्य ते पसरले समुद्राच्या काठावरती
अमर्याद असे पल्याड किनारा पाड पाहती
स्वभावतः लाजाळू ते खाकी वस्त्र लेवती
सागर देई पाणी नारळातून ते इतरा देती

असे विस्मय बहुत तयाला सागर कसा अगाध
मुळे उतरती जमिनीत घेण्यासाठी बोध
तपस्वी तो उभा युगांनी देण्यास फायदे विविध
अस्वस्थ ती होऊनि हलती येत सागरास क्रोध

असो नमन माझे त्वा अन्नदात्या स्वरूपा
उतूंगतेचा बोध देण्या उभ्या त्या स्वरूपा
तंतू तंतू तुझे आनती अनेक वस्तू रूपा
दुसऱ्यांना छत्र देशी स्वीकारून तापा

# सत्ता

सत्तेच्या मोहात सांडल्या रक्ताच्या धारा
जयजयकार जेत्यांचा गर्जे इतिहास सारा
सत्ता ज्याच्या बाजूस होई तोच ठरे खरा
प्रक्षुब्ध सीमा सतत राहती सत्तेचा किनारा

विचारांचे अमल पसरवे सत्तेची धुंद धुरा
जनतेचे स्वप्न राहिले नियतीच्या दरबारा
जनतेचा कौल दुबळा जसा वाहतो वारा
सत्ता पाही स्वप्न बनण्या अढळ ध्रुव तारा

सत्ता करे भ्रष्ट मनाला ना ओळखे ती बाप
दंभ अहं विस्तारत जाई तुडवे जनता पाप
दगड ना मृदुल होई फासता शेंदूर अमाप
जुनी कातडी फेकून देई चपळ जसा साप

सत्य न्याय बटीक अन हंसास करी काक
राज दंड तो फोडी माथी निर्बल विरोधक
गुंड होती मोकाट त्यांना नसे कोणता धाक
बंड कुठे दिसता त्यांचे तलवार कापी नाक

सत्य आणिक सत्ता यांचे होईल का मिलन
सत्तेवरती आरूढ होईल न्यायी नीतिमान
सत्य असे जड पचवण्या जिंकेल का जन
सत्य न्यायाच्या वाढेल का छायेत बलवान

सत्तेचा पुरुष तयाला शरीर असे काचांचे
आवरण असे नाजूक जरी हृदय दगडांचे
डोळ्यात त्याच्या रंग दिसती अंश सत्याचे
एका हाती तलवार दुसऱ्या वजन तराजूचे

# प्रेमभंग

तू किनाऱ्यावर, अन तरंग वाहात आले
कसे सांगू तुला माझे अंतरंग तेथे प्रकटले
तुषारात तुला पाहायचं होतं चिंब भिजलेले
वाळूतच विरलो तुला पाहून माघारी फिरलेले

मी एकतर्फी प्रेमी, स्वप्नांत तुला आळवतो
नेणिवेचे गाणे गाऊन मनाला रिझवतो
शब्द भाव ताल सूर लय सारे एकवटतो
तुझ्या जागी फक्त तुझी प्रतिमा ठेवतो

आवाज आर्त देतो, प्रतिसाद उमटेना
तुझ्या सौंदर्यात लपली लज्जित संवेदना
शोधात कारणांच्या जाणे मला पटेना
तू मुक्त अप्सरा बहारतेस माझ्या विना

तुझ्या विना मी झालो अस्तित्व एक शून्य
माझी नसे तो कुणाची न होई मजला मान्य
तुझ्या प्रेमात गावले सूर जगण्यास धन्य
मी पाहतो मनःपटल प्रतिमा तुझी अनन्य

प्रेमात व्हावे हळवे निस्सीम पूर्ततेसाठी
जरी शून्य उरले जगावे उदात्ततेसाठी
हत्या असे निषिद्ध प्रेमास अंतरी गाठी
जीवन फुल बहरावे काटेरी वसल्या देठी

प्रेम ना होवो व्यसन जे विघातक जीवना
वेदना जरी असे ती सुंदर असे भावना
उदात्त जगणे जगण्या देई शुद्ध प्रेरणा
प्रेम असे पल्याड जरी स्वप्न दुभंगे मना

# गरिबी

उरातली धडधड सांगे क्षणांची तीव्रता
भविष्यात दडलेल्या दिवसांची चिंता
काळ मजला पिळवटतो मनाचा गुंता
अर्थ येई तप्त मज राखेवरूनी चालता

एक एक नाणे मिळवून पुंजी होई जमा
मनास मी बंध बांधले उद्या येईल कामा
अश्रुंचे बांध फुटून कधी हाक देई रामा
मी एक गरीब कधी काम कधी रिकामा

पाय माझे थकले कधी अवघडले हात
शरीराच्या मर्यादा मी कशी करू मात
कधी सारे झोकून देऊन मदिरेची साथ
बिडी कधी फुंकून मी करी श्रमाचा पात

राखेवरूनी चालता ठिणगी त्याची होईल
त्या ठिणगीतून पुढे पाहण्या स्वप्न दिसेल
त्या स्वप्नांच्या सोबती काळ सुद्धा ओसरेल
धडधडणारे हृदय माझे जगणे फुलवेल

# कवी

विचारांची व्याप्ती आणिक शब्दांची संपत्ती
नाही तिथे आश्चर्य होता कवितांची उत्पत्ती
प्रसिद्धी पावन्या तयाला ना मिळाली क्लुप्ती
खाण्यासाठी भ्रांत त्याला इतकी त्याची प्राप्ती ॥ १॥

कविता होत्या श्रेष्ठ इतक्या जनतेला कळेना
विचार अति झेपावलेले मती लोकांची वळेना
निर्मितीचा आनंद तयाला तरी इतका पुरेना
बदलासाठी लेखणी धरली हेतू पुरा होईना ॥ २॥

हळू हळू अति उदास तो गहण राहू लागला
विस्कटलेली अल्प झोप जेवण नेमे त्यागला
इच्छा त्याची मरून गेली कसा बसा तो तगला
परी अंती जीवनातला आनंद सारा घटला ॥ ३॥

अंती त्याच्या मनात टाळ्या घुमू लागल्या
आभासी विचित्र आकृती मनी तया भासल्या
तारका तुटून मालिका गळ्यात त्याच्या आल्या
अतृप्त त्याच्या इच्छा साऱ्या विकृतीत भरल्या ॥ ४॥

तो कवी वेडा होऊन सर्वत्र भटकू लागला
कुणी टोमणे देता फिदी फिदी हसू लागला
कुणी त्याची ऐपत पाहून देती जेवायला
एकाने पाहून त्याला दगड एकदा मारला ॥ ५ ॥

घायाळ कवी आतून आणिक बाहेरून झाला
झोपडीत एका चटई वरती तो पडून राहिला
जंगल हे माणसाचे भयाण असे स्वगत म्हणाला
जन्मलो का इथे मी नियमात पांघरती सत्याला ॥ ६ ॥

सौंदर्य कुठे निरपेक्ष मिळेना ध्येय नसे जगण्याला
पूर्ण सत्य हि स्वर्गीय कल्पना मूर्त इथे होण्याला
विपरीत जगाचा न्याय मला कधी ना समजला
गरुड गिधाड राज्य करती काय किंमत कवीला ॥ ७ ॥

मनात त्याच्या थरकाप उडाला भयाण कंपाचा
उद्देश नसता जीवनाला अर्थ काय जगण्याचा
एक बुडबुडा वरती आला बुडातून सागराच्या
हवेत येऊन तो फुटला अवकाशी अंतराच्या ॥ ८ ॥

# नारी

कितीअंग मी झाकावे वा उघडे ठेवावे
ते माझे स्वातंत्र्य असे समाजाने का ठरवावे
कुठल्या चपला कुठले कपडे मी लेवावे
विचित्र वा अतिशहाणा टोमणे का मज द्यावे

लज्जा असे खरी परी मनावरचे आवरण
नवयुगातील नारी मी आवड माझी नवीन
सौंदर्य पाहणे पाप नसे ना चरित्राचे दालन
हक्क मजला दावण्या सौंदर्य माझे खुलून

सौंदर्याचे असंख्य मणी मी लज्जेत ओवीले
माझ्या कडे जे सुंदर आहे ते इतरा दाविले
सौंदर्य ज्याने पाहिले तयाला स्मित मी दिले
विकारी नजरा चोरट्या परतावून लाविले

अस्तित्व आणि अस्मिता माझा असे सन्मान
निसर्गाने सौंदर्य दिले दुजा ना करे निर्माण
स्निग्ध आणिक कोमल अंतर जो माझा प्राण
स्वत्व आणिक स्वातंत्र्य असे नित्य स्पंदन

# आशा

ढगांच्या फटीतून एक किरण बाहेर येतो
बरसून मेघ स्वच्छ जाता सूर्य प्रखर दिसतो
ढगाळल्या मनात मज प्रेरणेचा मार्ग अडतो
भावजल बरसून जाता स्वछ मी मला दिसतो

वातीवरती फडफडते चिवट बिचारी ज्योत
वार्यासंगे संघर्ष करुनि वाचवे स्वतःचे अस्तित्व
अंती ती तगेल वा तिज गिळेल झंझावात
आशा तिची असे श्रेष्ठ ना सहज सोडे वात

किती होती हेलकावे मन भटकता अंधारात
हरवून जणू मी जातो विचारांच्या कल्लोळात
ठाम कसे उभे राहावे चिखलात घसरगुंडीत
निर्णय ना हो दोन मनांच्या तीव्र झगड्यात

स्वच्छ जेव्हा होई मन स्वयं प्रकाशात
आशा करे वाटचाल निर्णयाच्या दिशेत
अस्तित्व तिचे प्रकट व्हावे जपावे जाणिवेत
नवीन दिवस देई चाहूल आशेची नेणिवेत

# भान आणि बंधन

मन एक द्रव्य असे जे साठवे स्मृती भावना
अहं होई नित्य निर्मित स्पर्श करता चेतना
चेतना जी प्रकाशमान देई जाणिव ती मना
अहं सारे चित्र पाहतो मनोपटला वरील ज्ञाना

भान आहे एकवटावे मनास अवलोकुनी
मनाच्या काचेतून विखुरल्या किरणातुनी
स्व च्या विविध रंगी भान येता जाई रंगुनी
मनाच्या कैक प्रेरणा जागती प्रकाशूनि

ढळून जाता भान निद्रेत जाईल मानव
भान येई पुन्हा जागता दावे त्याचा प्रभाव
पुन्हा अहं होई निर्मित पुनश्च्य अहंभाव
चालू राही शृंखला नेणीव अन जाणीव

अंतरंगा आकार देई विस्तारास जो अहंभाव
परी सीमित करून टाकतो स्वतःस तो डाव
चेतणेच्या प्रकाशात असीमित येई अनुभव
केंद्रित होऊन त्याच्यावरती मुक्त होई जीव

# पत्थराचा डोंगर

पत्थराचा डोंगर होता ना पिकवेना ना फुटेना
उतरंडीवर माणूस वसला जागेवरून हटेना
वरच्या स्तराला वर्चस्वाचा मोह काही सुटेना
खालच्यांना जीवनबंधन काही केल्या तुटेना

वरचा सांगे आकाशी देव त्यांनी प्रत्यक्ष पाहिला
त्यालाच तो बोलतो कारण जवळ तो नभाला
असंख्य विक्षेपात सांगतो दैवी आज्ञा प्रजेला
श्रद्धा रूढी परंपरा भांडवल मानसी रुजवला

एक श्रद्धा सांगे देव देता तोषतो आम्हा दान
देव मानव रुपी आम्ही द्यावा आम्हास मान
आम्ही दिले कर्म करावे त्यांचे जीवन कारण
कठोर शिक्षा होई जरी होता याचे विस्मरण

नीर क्षीर श्रद्धांचे करावे पुनश्च्य अवलोकन
दार्शनिक संतांचे घ्यावे दाखले पूर्ण समजून
चरित्र उंची पाहून अवश्य द्यावा कुना मान
स्वतः ईश्वर करंगुलीवर धरे पहाड उचलून

हळू हळू पहाड होईल न्यायी रचना समांतर
साऱ्यांचे अभ्यास दर्शनी होऊन बदले अंतर
बंधुभाव समान स्वतंत्र समाज होवो निरंतर
साऱ्यांसाठी क्षितिज असे मुक्ती तो मंतर

# पैशाची बेडी

दिवसाची चिंताग्रस्त भेदरलेली सुरुवात
तास मागे जातात कैक प्रश्नांच्या गुंताळ्यात
शेवटी डोक्याचा होतो गुंताळा कामात
सगळं जगणं विसरून जातं व्यापात

पैशाची बेडी बांधलेली पायात
अग्निचं सतत अस्तित्व उदरात
पैशाचं सुख असं घेतलेलं विकत
उद्याच्या चिंतेत आजची फारकत

छंदांची स्वप्न विरतात अंधारात
मनावरच्या दगडाचं ओझं राहावं वाहात
सततच्या तणावात व्यथा गोठून जातात
चिंतेच्या चित्तेवर मन राहतं धगधगत

मी हरवून जातो कृत्रिम आवेशात
स्वप्न पुढे ढकलून हरवत जातो काळात
ना स्वतंत्र ना समान कुरघोडीच्या राज्यात
उद्देश ही कृत्रिम या पारतंत्र्याच्या विळख्यात

# झरा

झुळूझुळू वाहे प्रवाही निर्झर स्वच्छ निर्मल झरा
हिरवळ संपन्न तया भोवती नटली होती धरा
खळखळ आवाज असा कि फिका पाडे शत घुंगरा
शृंगारीत वाटे प्रसन्न, सभोवती निसर्ग पसारा

निर्मळ होते पाणी नितळ खडक तळाशी दिसे
अचानक वेग वाढून धबधबा खाली कोसळतसे
वाटसरु तृष्णा भागवून निवांत विसावा घेत असे
युगुल गुज करण्यासाठी रम्य स्थळी विहारा बसे

एके दिवशी सापडला मानवी लालसेच्या माऱ्यात
दूषित रसायन मिसळून गेले रम्य त्या झऱ्यात
पीण्यासाठी राहिले न ते दुर्गंध सोडे वाऱ्यात
उध्वस्त झाला तो झरा जो वाहातसे तोऱ्यात

का बनवली झऱ्याची त्या गलिछ अशी गटार
का मिटवला निसर्गाच्या सुंदरतेचा बहार
संवर्धन केले नाही केला चंगळतेचा विस्तार
निसर्गाला मारक शैली का करता स्वीकार

# धारा

वास्तवाच्या धरती वरूनी वाहे विचारधारा
मार्ग आपला बनवत जाई अंती मिळे सागरा
स्वतःस घेई बांधून ती रेखाटे आपला किनारा
खळाळता मुक्त प्रवाही परी दुज्यांना सहारा

प्रत्येकाची विचारसरणी असे इथे स्वतंत्र
विकसित होण्या सारे गाती स्वतःचाच मंत्र
धन्य होती न्हाउनी पुजती आपलेच पात्र
कैक बनवती जगण्याच्ये ते एकमेव सूत्र

नका वळवू पात्र दुज्याचे नका करु दूषित
श्रेष्ठ माझा मार्ग म्हणुनी नका होऊ सीमित
धारेमध्ये धारा मिसळून जावे नेहमी वाढत
नित्य खळाळे झरा उगमे आपुल्या अंतरात

अंती मिळती विचार सारे जाणुनी सत्यास
परिक्रमा ती उगमापासून मिळे सागरास
सातत्याने वाहत वळसा घेऊन व्यत्ययास
अंतरासाठी अंतराचा अंतरातुन हा ध्यास

# झरोका

झरोक्यातून कुतूहलानं, अगम्य असं कवडस येत
आजाऱ्याच्या डोळ्यावर, उग्र चमकदार स्थिरावत
शोधणाऱ्या त्या दोन डोळ्यात, लखलखीत तळपत
वेदना अंधाराच्या वास्तवात आकस्मीत भर टाकत

वेदना, अंधार अन प्रकाश एवढच त्याच्या मतीत
तिन्ही मध्ये सत्य काय त्याला ना सुटलेलं गणित
वेदनेशिवाय मनात दुसरं होत नाही त्यास प्रतीत
याशिवाय माहित नसे मायावी जगाची त्यास रीत

कधी वाटे अंधाराप्रमाणं स्वतःला समजावं शून्यवत
वेदनासुद्धा बनते का शून्य मग ते पाहावं चाचपडत
जगण्याच्या प्रवाहात मन विझल कि सगळंच विझत
असणं सुद्धा काहींस ते निर्गुण निराकार शेवटी उरत

प्रकाशाचा त्वेष अंधाराशी कधीच होत नाही सहमत
शून्यच जर सत्य तर कवडश्याचा अर्थ नाही उलगडत
वेदनेला गिळून प्रकाशाचा मागोवा घेत राहावं भटकत
दिव्यत्वाची आराधना करून पाहावं भेटेल का शाश्वत

सत्य काय? प्रकाश कि अंधार कि वेदनेची नित्य सोबत
की झोकून देणं जीवन रुपी खळाळणाऱ्या प्रवाहात
विसर हाच उपाय वेदनेवर उपेक्षा त्यावर करेल मात
कुठं तरी सत्य वसलंय शोधावं जाऊन त्याच्या मुळात

# माया

माया असे प्रक्रिया जी फिरवे जगता अवती भवती
आसमंती गोल फेकले स्वच्छंदी स्व गतीत रमती
कुठे प्रदीप्त कुठे विझती अगणित तयांची व्याप्ती
ठाव तिचा ना लागे ध्याता जाणीव नेणीव तीच ती

कधी ना थांबे सतत बदलते नूतन असे प्रतिक्षणी
नित्य असे नावीन्य तिचे जन्म स्थिती अंत देऊनी
शाश्वताची चीर जाणीव तीच तयाची असे जननी
सत्य शोध ठरे निष्फळ तिच्या परीघा छेद देऊनी

मूर्त रूप धारण करती श्रोत असती सहज प्रेरणा
दास बनवी मानवासही वळवी निसर्ग तया मना
मनापासून मुक्त होण्या ना सहज हो सुटका कुना
अकस्मात कधी उमटे सत्यस्पर्श आनंद करुणा

काळासंगे येती आकारा अनंत गुपिते जिथे नांदती
विज्ञानाच्या कक्ष्येत येता असंख्य कोडी उलगडती
आकाशगंगा ओलांडता अब्ज आयुष्ये ना पुरती
विस्ताराचे प्रत्यक्ष दर्शन कल्पनेत वा स्वप्नात उरती

# पारतंत्र्य

माझ्या हाती नसे कुठे या जन्मा मी यावे
मी कसे ठरवू कोणते दुःख मज लाभावे
सुखाचेही माप मजला भरून कुणी द्यावे
वा जन्मतः हक्कांना का कुणी नाकारावे

जन्माआधी धर्म माझा का कुणी निवडावे
सत्याच्या जाणिवांना कैदेत का डांबावे
चिन्हांचे दास्यत्व माझ्या मनात बिंबवावे
कधी उतरंडीवरती जागा माझी ठरवावे

आलो मी जन्मास घेऊनि पुंजी नशिबाची
जन्म इथला असे परी शृंखला आव्हानांची
झगडणे असे सततची परीक्षा सामर्थ्याची
गुंताळे निर्माण होती संगत प्रश्न उत्तरांची

स्वातंत्र्य असो सम्यक मज दृष्टी मिळावी
सुख दुःखाच्या पार जाऊन ती स्थिती व्हावी
शून्य होऊन चित्ताची अवस्था न्याहाळावी
नितळ निर्मल स्वच्छ मनी सत्ये जाणावी

# आद्य

काहीच नव्हते ज्यात शून्यातून अकस्मात
काहीच नव्हते त्यात असे आले प्रत्यक्षात
काहीच नव्हते कारण स्वतःच विस्मयात
काहीच नव्हते त्या एकमेव अस्तित्वात

काय तो जाणिवेत प्रथम क्षण उगवला
काळ तया नच ठावे एकुलता लाभला
काय तो जाणिवेत आनंद बहू स्फुरला
तृप्तीत तो क्षण तया युगा सम भासला

काळ जसा भासला प्रश्न तया बोचला
काय हे अस्तित्व हे मी इथे का एकला
काय हे अस्तित्व हे कुठून मी उगवला
काय हे अस्तित्व हे कोण मी अवतरला

राहीन का क्षणोक्षणी असा मी सदोदित
शंकेचा काहूर तया डोकावला विपरीत
राहीन का क्षणोक्षणी असा मी आनंदित
तोष वृद्धीचा दोष उमटला तया भ्रमात

कुठे परंतु भंगून मी विस्तारावे आसमंत
कुठे परंतु वाढावे मी पसरावे मी अनंत
एकाग्र तया मनी झाली प्रकृती निर्मित
मूर्त होऊन असंख्य तो आला रूपात

जीवन येई आकारा मिती घेऊन मर्यादेत
माती पाणी मुळी शोषून सूर्य अन्न निर्मित
प्रकृतीचे शरीर जीवास भासे अंतिम सत्य
डोळ्यास बांधून पट्टी सत्यास शोधता सर्वत्र

मूळ स्फुरला आनंद तो चित्तात राहे लपून
निसर्गनिर्मित आनंद जाई क्षणांत हरवून
जन्मापासून जगणे मृत्यू प्रकृतीस गहाण
जिथे जीवन जरा मृत्यू दुःखास ते कारण

आद्याचा आनंद मजला परत गवसेल का
निसर्गाचे बंधन तोडून मी विमुक्त होईन का
आद्याचे अस्तित्व मी मनात शोधेन का
भ्रमर होऊनि शून्याभवती गुंजन करेन का

# निर्विकार

काळ निर्विकार आहे
त्याला ऋतूची चादर चढवा
दिवस रात्रीचे रंग द्या अथवा
सुख दुःखाची स्मृती शृंखला बनवा
तो निर्विकार आहे
भूत काळाची सावली तो आहे
आशाळलेला वर्तमान म्हणून जगतो
स्वप्नाळलेला भविष्य काळ पाहतो
तो निर्विकार आहे
जन्माचा उत्सव म्हणा
जगण्यातला उन्माद म्हणा
वा अवसाद म्हणा
मृत्यूचा पूर्णविराम म्हणा
तो निर्विकार आहे
तो असतो अगदी निसटणारा
घडाळयाच्या काट्यागत टिकटिक
कधी भासतो अगदी स्तब्ध

कंटाळवाणा तुरुंगातल्या खोलीतला
तो निर्विकार आहे
नियती धावते त्याच्यासोबत
मी अलगद नियतीच्या खांद्यावर
त्याचा एक खंड म्हणजे जीवन
तो निर्विकार आहे
विश्वाच्या आदी चा साक्षी
अन प्रलयाचाही तोच
विश्वाचं जगणं न्याहाळणारा
तो निर्विकार आहे

# अस्मादिक

मी, भार सहन करणारा, मनाच्या ओझ्याचा

मी, आकांतानं विव्हळणारा, वेदनांच्या माऱ्यात

मी, तणाव पेलणारा, जगण्याच्या संघर्षात

मी, भय बाळगणारा, भयाण वास्तवात

मी, अश्रू गाळणारा, अतीव दुःखात

मी, सुखाच्या मागे धावणारा

मी, लुब्ध होणारा, लालसेत

मी, प्रक्षुब्ध होणारा, क्रोधात

मी, जळणारा, द्वेषात

मी, फुगणारा, अहंकारात

मी, झुंजणारा, असह्य जरेत

मी, रमणारा, मागल्या आठवणीत,

मी, हरवणारा, मनस्वी छंदात

मी, बघणारा, रिकामा स्वतःकडे

मी, प्रवाहात वाहणारा, अथांग जीवनाच्या

मी, एक निर्देशक, अस्तित्वाला दिलेलं नाव

मी, कधीच नसणारा, माझा

मी, मात्र जाणवणारा, जणू शाश्वत

मी, फक्त असणारा, एक प्रक्रियेचा प्रवाह

मी, एक शून्य, फक्त शून्य

# श्वास

श्वास,

जीवनाचा अखंड श्रोत,

ठेवे रक्त वहात सतत

श्वास,

करतो उर्जेला निर्मित,

ठेवतो पेशींना तरतरीत

श्वास,

मनाच्या आधारा,

लांब सोडे सुस्कारा

श्वास,

कामाची वाढे उत्तेजना,

युगुलांच्या मनोस्पंदना

श्वास,

निमवीं मनावरचा ताण,

उश्वासाच्या लयीवर ध्यान

श्वास,

सांगतो सावधान,

उधळल्या मनाला बेभान

श्वास,

माघारी आणतो अवधान,

श्वासावर पुनश्च्य ध्यान

श्वास,

खोल खोल उतरे ध्यान,

अंती साधे निर्वाण

# चित्तबीज

ऐकलं होतं रक्तबीज
मारला तरी त्याला
रक्ताच्या एक एक थेंबातुन
करत असे निर्मित स्वतःला
शेवटी काली देवींन त्याला
एक एक थेम्ब
मारून पिऊन टाकला
अन त्याला संपवला
हे काली देवी,
माझ्या चित्ताच तसच आहे
काहीतरी विरतं मावळतं
दुसरं काही पुन्हा उगवतं
एका अनुभवातून दुसऱ्या
अथक ते सतत धावतं
या शृंखलेला थांबवलं तरी
रक्तबीजाच्या थेंबाप्रमाणं
पुन्हा बरसत काहीतरी

प्रयास विफल जातात सारी

वाटलं सार ना थांबवता

फक्त बघत राहावं

त्याचा भाग न बनता

अनुभव फक्त येता जाता

हे काली,

तू ती त्रयस्थ दृष्टी दे मला दान,

तुझ्या अस्त्रांप्रमाणे ती भेदेल

जाणीवा अनुभवांच्या बेभान

चित्त विक्षेपांची दाणादाण

दे मला तू वरदान

चित्त भूमी वरील घमासान

करो चित्तबीजाचे निष्प्रभ प्राण

अन नांदो तिथे कारुण्य निर्वाण

# तिमिरमंथन

एक सागर तिमिर ज्यावर आच्छादला अखंड
लाटा उठती फेसाळत गर्जे स्वर दुःखात बंड
तुषार तयाचे शिंपडती असह्य शहारती थंड
भरती आणिक ओहोटी येता गूढ वाटे प्रचंड

कली नामक दैत्य ठरवे करावे ते तिमिरमंथन
विचारांची शृंखला घुसळावी ज्ञान मेरुस बांधून
तिमिर वेष्टिला सागरा जल गेले तिमिर होऊन
असंख्य वस्तू बाहेर येता करावे युगास निर्माण

मंथन होता सूरु आला सर्प अति लांब विशाल
फुत्कार तयाचा तीव्र होता नशेचा होई अमल
कली म्हणाला विचार तोडून स्वप्नात हा नेईल
नशेत माणूस विरता विहंगम घिरट्या घालील

लज्जित अबला नारी आली पुढील फेरीला
वारांगना नाव पाहून कली बेहोष आनंदला
अनेक संसार हो उघडे लागून हिच्या नादाला
भय लावावे हिच्या नशिबी बांधण्या धंद्याला

हाती घेऊन फासे आला शकुनीचा अवतार
धनिकांची मुले होती धुंद खेळुनि हा जुगार
सोबत चढे धुंदी अन लागे भांडणास धार
घर, शेती सोने विकूनी रस्त्यावरती संसार

पाठीस लागले पोट माखला शेतकरी घामात
असेच आले दुःखाचे पुतळे जणू साक्षात
बलात्कारित बालिका, उघडी पोरे रस्त्यात
किन्नर, दारुडे, भिकारी, वेडे कपडे ना अंगात

सगळ्यात शेवटी आली होती मूर्ती एका देवीची
हाक दुःखे शाश्वत मानुनी तिलाच पुजन्याची
कारुण्य आपुले प्रकट करुनि सेवा मानवतेची
मानवता वरती आहे शलाका विश्वासाची